# जिल्हा परिषद रत्नागिरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन.**
**माळनाका, रत्नागिरी ४१५६१२**

## सामान्य प्रशासन विभाग

**दुरध्वनी क्र- ०२३५२ - २२२४२८** **ई-मेल :- dyceogad08@gmail.com**


जा.क्र. रजिप/साप्रवि/आस्था-७/अनुकंपा/४७९५ /२०२१ दिनांक:- ०१.११.२०२१

**नोंदणीकृत टपालाने**

**प्रति,**

**संबंधित (अनुकंपा उमेदवार),**
**श्री./श्रीम.........................**

**विषय :- अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी गट क व गट- ड पदांसाठी विकल्प तसेच जिल्हा परिषद किंवा अन्य शासकिय कार्यालयात नियुक्तीसाठी विनंती अर्ज सादर करणेबाबत...**

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.अकंपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ दिनांक २१.०९.२०१७
२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : अकंपा १२२१/प्र.क्र.१८६/का-८ दिनांक २६.०८.२०२१
३) या कार्यालयाकडील पत्र क्र. रजिप/साप्रवि/आस्था-७/अनुकंपा/४५४९/२०२१ दिनांक १८.१०.२०२०
४) मा. मु.का.अ यांचकडील मंजुर टिप्पणी दिनांक ०१.११.२०२१

उपरोक्त विषयानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेकडील अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी प्राप्त झालेल्या परिपुर्ण, अपुर्ण व अपात्र अर्जांची दिनांक १०.०८.२०२१ अखेर तात्पुरती प्रतिक्षा यादी संदर्भ क्र. ३ अन्वये प्रसिध्द करणेत आली असून रत्नागिरी जिल्हा परिषद कार्यालयाचे **www.zpratnagiri.org** व रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयाचे **www.ratnagiri.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आली आहे, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**तसेच संदर्भ क्र. २ चे शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती प्राधिकारी यांनी गट- क व गट- ड साठी स्वतंत्र प्रतिक्षासूची ठेवणेबाबत कळविले आहे. तसेच नियुक्ती प्राधिका-याच्या स्तरावरील प्रतिक्षासूचीत उमेदवारांचे नाव अंतर्भूत केल्यानंतर सदर नाव जिल्हास्तरीय सामायिक प्रतिक्षासूचीसाठी संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकारी कार्यालयास पाठवावे, असे नमूद आहे.**

**त्यामुळे जिल्हा परिषदेकडून गट-क व गट-ड साठी स्वतंत्र प्रतिक्षासूची ठेवण्यात येणार आहे. तसेच जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून गट-क व गट-ड साठी एक अशा एकूण दोन स्वतंत्र सामायिक प्रतिक्षासूची तयार करण्यात येणार आहेत.**

सदरची माहिती महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक : अकंपा १०१०/६७/प्र.क्र.४१/ १०/आठ दिनांक १५.०५.२०१० नुसार सोबतचे प्रपत्र अ नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. सोबतच्या प्रपत्र अ नमन्यातील स्तंभ क्र. १० मध्ये नियुक्ती साठी शिफारस कोणत्या कार्यालयात केली हे नमूद करणे आवश्यक आहे. **वरील संदर्भीय क्रमांक २ चा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. अनुकंपा तत्वावर नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती प्रसिध्द करणेत आलेल्या आहेत. तो अवलोकन करावा.**

त्याअनुषंगाने वरील माहिती व शासन निर्णयाचे अवलोकन करुन आपण या कार्यालयास सादर केलेल्या अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेसाठी अर्जांच्या अनुषंगाने **गट-क व गट- ड पदांसाठी विकल्प तसेच जिल्हा परिषद किंवा अन्य शासकिय कार्यालयात नियुक्तीसाठी शिफारस करावयाची आहे** याबाबत लेखी स्वरुपात विनंती अर्ज सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद रत्नागिरी या कार्यालयाकडे देण्यात यावा.

आपण सादर केलेला गट क व गट- ड पदांसाठी विकल्प कार्यालय मागणीचा विनंती अर्ज हा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद रत्नागिरी, तिसरा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, माळनाका रत्नागिरी पिनकोड- ४१५ ६१२ या पत्त्यावर **नोंदणीकृत टपालाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत दिनांक १५.११.२०२१ पर्यंत** सादर करण्यात यावा. जेणेकरुन जिल्हा परिषद स्तरावरील व जिल्हास्तरीय सामायिक प्रतिक्षासूचीसाठी आपले नावाचा अंतिम यादीत समावेश करता येईल.

सदर प्रकरणी कोणत्याही प्रकरचा विलंब होणार नाही, याची सर्व उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ.इंदुराणी जाखड, भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**